REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 7 | APRIL - 2024

# मराठेकालीन किल्ल्यांची उपयुक्तता आणि महत्त्व

डॉ. सुरेंद्र अर्जुन शिरसट
सहयोगी प्राध्यापक,
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, इंदापुर, जि. पुणे.



'शत्रूपासून संरक्षण करण्यास सुलभ जावे आणि सभोवतालच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवता यावे, म्हणून बांधलेल्या वास्तुस किल्ला संबोधले जाते.'[1] इंग्रजीत कॅसल, फोर्ट, सिटॅडल, बर्ग वगैरे संज्ञांनी किल्ल्यांचा उल्लेख होतो, तर मराठीत दुर्ग, गिरिदुर्ग, द्वीपदुर्ग, जंजिरा, गढी, कोट, गड, बालेकिल्ला वगैरे संज्ञांनी या वास्तुचे वेगवेगळे प्रकार दर्शविले जातात. 'किला' हा मुळचा अरबी शब्द आहे. 'गड किंवा गढ' हा हिंदुस्थानी शब्द, 'दुर्ग' हा संस्कृत शब्द आहे. लहान आकाराच्या किल्ल्यांना कोट, गढी असे संबोधतात.[2] प्राचीन पाश्चात्य व पौर्वात्य साहित्यात किल्ल्यांचे अनेक प्रकार वर्णिलेले आहेत. परंतु वास्तुशास्त्राच्या दृष्टीने तीनच प्रकार संभवतात, ते म्हणजे भुईकोट किल्ला, गिरिदुर्ग किंवा डोंगरी किल्ला आणि द्वीपदुर्ग किंवा जंजिरा.[3]

"संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येताच निराश्रय प्रजा भग्न होऊन देश उध्वस्त होतो... हे राज्य तरी तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनी गडांवरून निर्माण केले... गडकोटविरहित जे राज्य त्या राज्याची स्थिती म्हणजे अभ्रपटल न्याय आहे. याकरिता ज्यास राज्य पाहिजे त्याणी गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मुळ, गडकोट म्हणजे आपले प्राणरक्षक, यैसे चित्तास आणीन कोण्हाचे भरवशावर न जाता, आहे त्याचे संरक्षण करणे व नूतन बांधणे याचा हव्यास स्वत:च करावा."[4] या रामचंद्रपंत अमात्य यांच्या शब्दांत किल्ल्याचे महत्त्व तर समझतेच पण प्रस्तुत प्रकरणात मांडला जाणारा व किल्ल्याच्या व्यवस्थेवर केला जाणारा खर्च कितपत योग्य असा प्रश्न उपस्थित करण्याची आवश्यकता नाही. छत्रपती शाहूंच्या कारकिर्दीत एकही तालुका किंवा परगणा किल्ल्याविना नव्हता, असे छत्रपती शाहू महाराजांच्या *'जाबिता स्वराज्य'* मध्ये नोंदविले आहे.[5]

## १. किल्ल्याचे अधिकारी आणि प्रशासन

किल्ल्यावर हवालदार, सबनीस व सरनौबत किंवा तटसरनौबत हे प्रमुख तीन प्रकारचे अधिकारी होते. त्याशिवाय किल्ल्यावर कमाविसदार हा आर्थिक कारभार पाहणारा महत्त्वाचा अधिकारी होता. कमाविसदार हा अधिकारी असला तरी तो मक्तेदार होता. शासनाशी करार करून कमाविसदार महसुलाच्या जमा-खर्चाची जबाबदारी घेत असे. त्या-त्या वर्षीचा अजमास, त्याला दिलेली सनद यानुसार त्याचा मक्ता ठरून, मक्ता-करारातील

निर्देशानुसार तो आर्थिक कारभार पाहत असे. किल्ल्यावरील शिबंदीची जबाबदारी हवालदाराची असल्याने शिबंदीवर त्यालाच नियंत्रण ठेवावे लागत असे. याचे संदर्भ इ.स. १७७४ साली नाना फडणविस यांनी पुरंदरचे हवालदार दीपाजीराव येरुनकर यांना पाठविलेल्या पत्रात येतो.[6] हवालदार हा सबनीस आणि सरनौबत यांचाही प्रमुख मानला जात असे. सर्वसाधारण जमाखर्चाची नोंद ठेवणे आणि प्रामुख्याने हजेरीपट ठेवणे हे सबनीसाचे काम असे.[7] सबनीस हा हवालदारास हिशोब समजावून सांगत असे व हवालदार त्यावर शिक्कामोर्तब करीत असे. तटाच्या पहाऱ्याची, बंदोबस्ताची व्यवस्था पाहण्याची जबाबदारी तटसरनौबताची असे. कारखानीस हा किल्ल्यावरील विविध कारखान्यांतील वस्तुंच्या नोंदी ठेवत असे. किल्ल्याचा आकार व त्याच्या रचनेवरून किल्ल्याची किल्ले प्रशासनाच्या दृष्टीने विभागणी केली जात असे. उदाह्लणार्थ पुरंदर-वज्रगड किल्ल्याचे प्रशासन व भू-रचना या दृष्टीने तीन विभाग होते. ते विभाग भाग पुरंदर, ठाणे माची आणि वज्रगड असे होते. या तीनही विभागांसाठी स्वतंत्र लष्करी अधिकारी आणि शिबंदी असे. सिंहगडावर मात्र अशी विभागणी नव्हती. अर्थात किल्ल्याच्या रचनेनुसार अंतर्गत प्रशासनाची विभागणी असल्याचे जाणवते. किल्ल्यास नेमलेल्या कमाविसदाराकडून केले जाणारे अर्थव्यवस्थापन मात्र एकसंघ असे कधी ते अनेक किल्ल्यांसाठी एकत्रित असे. कल्याण भिवंडी प्रांतातील रतनगड, कलोलगड, बहिरवगड, गोरखगड, सिदगड, कोथळागड, मलंगगड, घोटवडा अशा सहा किल्ल्यांसाठी एकाच कमाविसदाराच्या अधिकाराखाली अर्थव्यवस्थापन असे.[8]

## २. राजकीय संघर्षाच्या काळात सुरक्षित ठिकाण

सिंहगड किल्ला पेशव्यांच्या ताब्यात आल्यानंतर नोव्हेंबर १७५१ मध्ये पेशवे आणि निजाम यांचे संबंध बिघडले. निजामाचे पुणे परिसरात आक्रमण करताच पेशव्यांनी पुण्यातील काही महत्त्वाचे दस्तऐवज, चीज वस्तू आणि पर्वतीवरील सोन्याच्या मूर्ती सिंहगडावर पाठविल्याच्या नोंदी आहेत. इ.स. १७६२ साली किल्ले सिंहगड येथे धामधुमीमुळे जामदारखाना रवाना केला.[9] इ.स. १७६३ मध्ये झालेल्या राक्षसभुवनच्या लढाई पूर्वी निजाम याने पुणे परिसरात आक्रमण केले असता, पेशव्यांनी सुरक्षिततेच्या कारणास्तव आपल्या परिवारातील सदस्य गोपिकाबाई, तिचा मुलगा व इतर मंडळी यांना संरक्षणाच्या दृष्टीने किल्ल्यावर ठेवले होते. पोथ्या, पुस्तके, पर्वती देवस्थानातील सोन्याच्या मूर्ती, महत्त्वाची प्रशासकीय कागदपत्रे आणि संपत्ती सिंहगड किल्ल्यावर ठेवल्याचे संदर्भ मिळतात.

किल्ल्यावर जवाहिरखाना असे. तेथे अनेक मौल्यवान वस्तू असत. अशा याद्या किल्ल्याच्या जमाखर्चाच्या 'झडती' नावाच्या कागदपत्रात किल्यावरील वस्तुंच्या सविस्तर याद्या पहावयास मिळतात. 'जंजिरेकर शामल (जंजिऱ्याचे सिद्दी) यांस तहाचे ऐवजी सिंहगडाचे मुक्कामाहून सात हजार रूपयांचे सोने दिले होते.'[10] मे १७७६ साली सवाई माधवरावाच्या सांगण्यावरून मोजदाद करण्यात आली[11] यावरून किल्ला हा मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवण्यासाठी उपयोगात आणला जात असल्याचे दिसते.

## ३. किल्ला शासकीय मुख्यालय

प्रांताचा कारभार किल्ल्यावरून चालत असे. उदा. पुरंदर किल्ल्यावर पुणे प्रांताचे प्रशासकीय मुख्यालय होते. तसेच गावोगावचे वतनी अधिकारी हे महसूल जमा करण्यासाठी पुरंदर किल्ल्यावर जात असत. म्हणून अनेक किल्ल्याना केवळ परिसराचे संरक्षण करण्यासाठी म्हणूनच नव्हे तर प्रांताचे प्रशासकीय मुख्यालय असल्याने महत्त्व होते. एवढेच नव्हे तर बाळाजी विश्वनाथ याने छत्रपती शाहू महाराज यांच्या माध्यमातून कारभार पाहण्यास सुरुवात केली तेव्हा काही वर्षे पुरंदर किल्ल्यावरूनच पेशवा म्हणून कारभार पाहिला. सिंहगड किल्ल्यावरून कर्यात मावळ महालचे कामकाज चालत असे. कर्यात मावळ मधील ३६ व तरफ हवेलीमधील २० अशा ५६ गावांच्या या

महालाचे मुख्यालय सिंहगडावर होते. अशीच मुख्यालये अनेक किल्यांवर दिसतात. परिसराचा कारभार किल्यांवरुन चालत असे. **किल्ल्यावरुन लगतच्या प्रांत अथवा परगण्याच्या महसूल वसूलीचा उपक्रम चालत असे. लगतच्या परगण्यांतील अथवा किल्ल्यास नेमुन दिलेल्या सरंजामी प्रदेशातील वसूल जमा होत असे गावोगावचे महसुली प्रमुख जसे पाटील, कुलकर्णी आणि महसुली नोकरदार हे काम करीत असत. उदा. पुणे प्रांताचा महसुली वसूल पुरंदर किल्ल्यावर जमा होत असे.**

## ४. किल्ल्याचे शिबंदीस इतर ठिकाणी जबाबदारी

शासनाच्या विशेष मोहिमांच्या वेळी किल्ल्यांवरील शिबंदीपैकी चांगले बरकंदाज नेमले जात. इ.स. १७९०-९१ साली कर्नाटक स्वारी साठी २९ किल्ल्यांवरील नेमणुका २५, ५०, ५०० अशा प्रमाणात केल्या. अर्थात किल्ल्यांवरील लोक स्वारीसाठी पाठविण्यात आले होते. किल्ले पुरंदर वरून १०० तर किल्ले सिंहगड ७५ लोक याना खर्चासह पाठवून द्यायला सांगण्यात आले.[12] पुण्यात दरवर्षी ब्राह्मणांना दक्षणा वाटप (रमणा) व्यवस्थेसाठी किल्ल्यांवरून शिबंदी मागविली जात असे. इ.स. १७७५ साली श्रावण महिन्यामध्ये सिंहगडावरून ७५ सैनिकांना पुण्यात पाठविण्यास सांगण्यात आले असता, १०० सैनिक पाठविण्यात आले होते[13] अशी माहिती मिळते.

## ५. किल्ल्यावरील तुरूंग व्यवस्था

किल्ला हा केवळ परिसरातील प्रदेशाच्या संरक्षणासाठी असला तरी किल्ल्यावर अनेक कामे चालत. त्यातील एक म्हणजे किल्ला हा तत्कालीन तुरूंग होता. शिक्षा झालेले कैदी, राजकीय स्वरुपाचे आरोपी किल्ल्यावर ठेवले जात असत. तुळाजी आंग्रे यांना फितुरीबद्दल पकडून आणल्यावर त्यांच्या सोबत पकडलेले सतरा लोकांना कैद करून सिंहगडावर पाठविण्यात आले. त्यांच्याबाबत आदेश असा होता की, 'यांस किल्ल्यावर घेऊन बेड्या घालून इमारतीवर मजुरी माणसांत काम घेऊन पोटास दररोज दर असामीस शेर किल्ले मजकूरेचे कोठीपैकी देत जाणे'.[14] त्याच पत्रात तुळाजी आंग्रे यांच्या बाबत मात्र वेगळा उल्लेख होता. तो असा की, 'कैद करून पायात बिड्या घालून तुम्हाकडे अटकेत ठेवावयास पाठविले असेंत तरी बिडीसुद्धा किल्ल्यावर अटकेत ठेवून पोटास दररोज पीठ जोरीचे वजन पक्के एक शेर व डाळ वजन पक्के पावशेर व मीठ पैसाभर देत जाणें. भोजनसमयी खबरदार ठेवून भोजन जाहल्यानंतर फिरोन बिडी घालून चौकी पहाऱ्याची बहुत खबरदारी करीत जाणे.'

याचा अर्थ असा की, कैद्यांच्या भोजनाची व्यवस्था शासन करीत असे. सामान्य कैद्यांना किल्ल्यावर मजूरी करावी लागे. तर बड्या राजकीय कैद्यांना मात्र मजूरीचे काम न लावता बेड्यांतच ठेवले जात असे. कैद्यास खाण्यासाठी काय द्यावे, किती द्यावे हे शासनाकडून कळविले जात असे, त्याची व्यवस्था किल्ल्याच्या खर्चात केली जात असे.

किल्ले हे केवळ राजकीय-लष्करी दृष्टीनेच महत्त्वाचे होते असे नव्हे. त्या व्यतिरिक्त अनेक कारणांनी किल्ल्यांना महत्त्व असल्याचे दिसून येते. किल्ला हे त्या प्रांत किंवा परगण्याचे, महालाचे प्रशासकिय केंद्र असे. किल्ला शासनाचे स्थानिक कोषागार असे. किल्ला लष्करी मोहिमा आणि इतर कारणासाठी शिबंदी उपलब्ध करुन देण्याचे माध्यम असे. किल्ला ही तत्कालीन तुरुंग व्यवस्था असे. अशा किल्यांच्या अशा विविध उपयोग पाहता येतात.

---

1 लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), **मराठी विश्वकोश**, खंड- ३, मुंबई, पुनर्मुद्रण, पृ. ९६०.

2 लहु कचरू गायकवाड, **'सिंहगड किल्ल्याचा इतिहास (प्राचीन ते अर्वाचीन)'**, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास सादर केलेला अप्रकाशित लघुशोध प्रबंध, पृ. ४६.

[3] लक्ष्मणशास्त्री जोशी (संपा.), पूर्वोक्त, पृ. ९६०.

[4] अ. रा. कुलकर्णी, (संपा.), **रामचंद्रपंत अमात्यांचे आज्ञापत्र मोडी-मराठी-इंग्रजी**, पुणे, २००७, पृ. १७५.

[5] सुरेंद्रनाथ सेन, **मराठ्यांची प्रशासकीय व्यवस्था (राज्यकारभार)** १६३० ते १८१८, (अनु. डॉ. सदाशिव शिवदे), पुणे, २०१५, पृ. ८४.

[6] विश्वनाथ काशिनाथ राजवाडे, (संपा.); **मराठ्यांच्या इतिहासाची साधने**, खंड- ६, १९०९, पत्रांक- १५०, पृ. ९७.

[7] सुरेंद्रनाथ सेन, **मराठ्यांची प्रशासकीय व्यवस्था (राज्यकारभार)** १६३० ते १८१८, अनु. डॉ. सदाशिव शिवदे, स्नेहल प्रकाशन, प्रथमावृत्ती २०१५, पृ. ८४.

[8] **पुणे पुरालेखागार, प्रांत आजमास उत्तर कोकण**, रुमाल न. ११२५, झडती किलेहाय, उदधृत तिखे संदीप, प्रांत कल्याण भिवंडी, अप्रकाशित शोधनिबंध.

[9] का. ना. साने, (संपा.), पूर्वोक्त, पृ. ५६-५७.

[10] का. ना. साने, (संपा.), **माधवराव बल्लाळ उर्फ थोरले माधवराव पेशवे यांच्या कारकिर्दीतील** भाग- १, पुणे, १९११, पृ. ५६-५७.

[11] पुणे पुरालेखागार, संशोधनासाठी निवडलेली कागदपत्रे, दप्तर क्र. १९, पुडके क्र. ३, पत्र क्र.- १०७१६.

[12] Ganesh Chimnaji Wad, **Selections from Satara Rajas and The Paishwa's Diaries**, Part-IV, Pune, P. 24-25.

[13] पुणे पुरालेखागार, संशोधनासाठी निवडलेले कागद, दप्तर क्र. १९, पुडके- ७, पत्र क्र. १११७३.

[14] का. ना. साने, (संपा.), पूर्वोक्त, पृ. ५६-५७.